वाचले :

१. माहिती व तंत्रज्ञान विभाग, आदेश क्र. मातंवि/१६/कावि/२६०/२०२१ दि.२६/१०/२०२१
२. माहिती व तंत्रज्ञान विभाग, आदेश क्र. मातंवि/०२/कावि/१७३/२०२२ दि.०३/११/२०२२
३. माहिती व तंत्रज्ञान विभाग, आदेश क्र. मातंवि/०२/कावि/२३०/२०२३ दि.२२/१२/२०२२
४. मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक१६/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग,
क्र:सा.प्र.वि/०२/कावि/४१४/२०२४
दिनांक :१८/०७/२०२४

विषय- City Transformation Office (CTO) चे कामकाजासाठी क्र.मातंवि ०८/२०२०-२१ अन्वये नेमणेत आलेल्या मे.Palladium Consulting India Pvt.Ltd. या कामकाजाकरीता निविदा क्र. १६/२०१९-२० अन्वये नेमणेत आलेल्या संस्थेचे वार्षिक देयकापोटी बीलांची अदायगी करण्याबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड शहराची एक अव्दितीय ओळख विकसित करण्याकरीता City Transformation Office (CTO) ची स्थापना करण्यात आलेली आहे. City Transformation Office (CTO) मार्फत मुख्यत: खालील सहा विषयांवर कामकाज केले जाते.

१. Sustainable Mobility: Multimodal Mobility, Access & Safety and Air Quality
२. Environment and Living: Environmental Health, Ecosystem Vitality and Living
३. Sports, Tourism and Culture: Culture & Tourism and Sports.
४. Law and Governance: E-Governance, E-Participation and Government Effectiveness
५. Information technology : ICT Readiness, Technology Readiness and Digital Maturity And schemes sponsored by MoHUA
६. Economic Development : Ease of doing Business, City Momentum and Employment

उपरोक्त कामकाजाच्या अनुषंगाने Appointment of Principal Consultant for Managing the City Transformation Office (Execution Phase) aimed at drinving key City development projects for Pimpri-Chinchwad City या विषयाचे कामकाजाकरीता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत ई-निविदेची प्रक्रीया राबविण्यात येवून मे.Palladium Consulting India Pvt.Ltd. या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत दिनांक ५ ऑक्टोंबर, २०२१ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार दिनांक २६/१०/२०२१ रोजीचे आदेशातील अटी व शर्तीनुसार अनुभवी सल्लागारांचे वार्षिक देयकापोटी एकुण र.रु २, ८९, ९९,९९२/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी एकोणनव्वद लाख नव्यांन्नव हजार नऊशे ब्यान्नव फक्त) करांव्यतिरिक्त या प्रमाणे अदा करणेत येते.

City Transformation Office (CTO) चे उपरोक्त विषयाचे कामकाजाचे अनुषंगाने मे.Palladium Consulting India Pvt.Ltd. संस्थेस माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत वेळोवेळी मुदवाढ देण्यात आलेली आहे. या

संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या अनुभवी सल्लागारांचे वार्षिक देयकापोटी अदा करावयाची रक्कम विहित वेळेत अदा करणे आवश्यक आहे.

सबब, मे.Palladium Consulting India Pvt.Ltd. यांचे कामकाजाचे बील अदायगीपुर्वी कार्यमुल्यमापन करण्याकामी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उपआयुक्त, सामान्य प्रशासन | - | अध्यक्ष |
| २. | मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी | - | सदस्य |
| ३. | मुख्य लेखा परिक्षक | - | सदस्य |
| ४. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | - | सदस्य |
| ५. | संबंधित विभाग प्रमुख | - | सदस्य |

उपरोक्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार मे.Palladium Consulting India Pvt.Ltd. यांचे सोबत करण्यात आलेला मुळ करारनामा तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या मुळ आदेशातील अटी व शर्तीनुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत वार्षिक देयकापोटी बीलांची अदायगी करण्यात यावी. सदर कामकाजाकरीता आवश्यक अंदाजपत्रकीय तरतुद माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सामान्य प्रशासन विभागाकडे लेखा विभागाने तातडीने वर्ग करावी. सदर कामकाजावर विभागप्रमुख, सामान्य प्रशासन विभाग यांचे नियंत्रण राहील.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून करण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति,

१. मे.Palladium Consulting India Pvt.Ltd.
८३, अ-१, सकाळ नगर, बाणेर रोड,
औंध, पुणे ४११ ००७

२. माहिती व तंत्रज्ञान विभाग

E:\desktop\mandhan gr\dhoran.docx